# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जनसंपर्क कक्ष

### दैनंदिन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या वार्ता

**(दि. १८ नोव्हेंबर २०२५)**

**दै. सकाळ**



कोल्हापूर : ६३ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळलेली शिवाजी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत.

# प्रशासकीय गुणवत्तेत सात विभाग अव्वल

## विद्यापीठाच्या वर्धापनदिनी आज पुरस्कारांचे वितरण; जैवतंत्रज्ञान, अर्थशास्त्र विभाग 'उत्कृष्ट'

**कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाने प्रशासकीय गुणवत्ता अभियान राबविले. त्यामध्ये विद्यापीठातील संलग्नता टी-वन, कॉमन फॅसिलिटी सेंटर (सीएफसी), आय. टी. सेलसह सात विभागांनी अव्वल स्थान पटकविले आहे. या प्रशासकीय गुणवत्ता आणि उत्कृष्ट अधिविभाग, गुणवंत शिक्षक-कर्मचारी; अशा विविध पुरस्कारांचे वितरण उद्या, मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात होणार आहे.**

या कार्यक्रमास कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाने ३१ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरदरम्यान प्रशासकीय गुणवत्ता अभियान राबविले. त्यात संलग्नता (टी-वन), सीएफसी, आय. टी. सेल, भांडार विभाग, मुलांचे वसतिगृह, स्कूल ऑफ नॅनो सायन्स, स्त्री अभ्यास केंद्राने प्रथम क्रमांक पटकविला. तक्रार निवारण कक्ष, संगणक केंद्र, परीक्षा प्रमाद विभाग, कॅशबुक विभाग, आरोग्य केंद्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाने द्वीतीय क्रमांक मिळविला. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, समाजशास्त्र विभागाला तृतीय क्रमांक, तर इंटरनेट युनिट, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र उत्तेजनार्थ ठरले. जैवतंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र या विभागांनी उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कारावर नाव कोरले.

### गुणवंत शिक्षक, सेवक, प्राचार्य...

■ प्रा. डॉ. पद्मा दांडगे (जीव-रसायनशास्त्र अधिविभाग, विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार), अधीक्षक विजय पोवार (कॅशबुक विभाग), सहायक अधीक्षक विनय पाटील (आस्थापना पी. जी. विभाग), हवालदार कल्लाप्पा पोटले (कुलगुरू कार्यालय), प्रयोगशाळा परिचर राजेंद्र बारड (जीव-रसायनशास्त्र अधिविभाग, विद्यापीठातील गुणवंत सेवक पुरस्कार), प्रा. डॉ. विकास मिणचेकर (श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार), प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर (बळवंत महाविद्यालय विटा, गुणवंत प्राचार्य पुरस्कार), प्रा. डॉ. जयवंत इंगळे (प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय मलकापूर, गुणवंत शिक्षक पुरस्कार), मुख्य लिपिक प्रकाश कांबळे (कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज), प्रयोगशाळा परिचर दिलीप सुवासे (पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव, महाविद्यालयीन गुणवंत सेवक पुरस्कार).

**दै. पुढारी**

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६३ वा वर्धापन दिन

## प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार जाहीर; गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवकांचा होणार गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन मंगळवारी (दि. १८) सकाळी ८.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात साजरा होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय माहेश्वरी उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.



कोल्हापूर : ६३ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळलेली शिवाजी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत. (छाया : पप्पू अत्तार)

सोमवारी विद्यापीठाने प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार जाहीर केले. यात प्र-कुलगुरू यांच्या अधिपत्याखालील संलग्नता टी-१ (प्रथम क्रमांक), तक्रार निवारण कक्ष (द्वितीय) तर कुलसचिव अखत्यारीतील सीएफसी सेंटर (प्रथम), संगणक केंद्र (द्वितीय) क्रमांक मिळवला. परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकाकडील आयटी सेल विभाग (प्रथम), परीक्षा प्रमाद विभाग (द्वितीय) क्रमांक मिळवला. वित्त व लेखाधिकारी यांच्या अधिपत्याखालील भांडार विभाग (प्रथम), कॅशबुक विभाग (द्वितीय) क्रमांक पटकावला.

सहाय्यभूत सेवा विभागात मुलांचे वसतिगृह (प्रथम क्रमांक), आरोग्य केंद्र (द्वितिय), बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र (तृतीय) व इंटरनेट विभागाने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. पदव्युत्तर विभागातंर्गत स्कूल ऑफ नॅनो सायन्स (प्रथम), अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला (द्वितीय), समाजशास्त्र विभाग (तृतीय), दूरशिक्षण व ऑनलाईन विभाग (उत्तेजनार्थ) क्रमांक पटकावला. अध्यासन केंद्रात स्त्री अभ्यास केंद्र (प्रथम) व शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन (द्वितीय) क्रमांक मिळवला.



शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला सोमवारी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाली. छाया: नसीर अत्तार

# गुणवत्तापूर्ण संशोधनाने पातळी उंचावली, शिवाजी विद्यापीठ १६२ पेटंटचे मानकरी

## आज वर्धापनदिन : बौद्धिक संपदा कक्षामुळे पेटंट मिळवणाऱ्यांच्या संख्येत झाली वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नव्या शैक्षणिक धोरणात संशोधनाला चालना देण्यासाठी पावले उचलली जात असली तरी शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील संशोधक प्राध्यापकांनी आतापर्यंत तब्बल १५६ पेटंट मिळवत या संशोधनाला अधिक बळ दिले आहे. शिवाय संशोधक प्राध्यापकांनी आतापर्यंत ६ कॉपीराइटही घेतले आहेत. विद्यापीठाचा आज, मंगळवारी ६३ वा वर्धापनदिन साजरा होत आहे. सहा दशकांच्या काळात विद्यापीठाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संशोधनाची पातळीही उंचावली. या पेटंटमध्ये भारताबरोबरच युके, जर्मन पेटंटचाही समावेश आहे.

विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क कक्ष हा स्वतंत्र विभाग असून या विभागाच्या माध्यमातून संशोधकांना पेटंट घेण्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे. संशोधकांना सर्व प्रकारचे साहाय्य केले जात असल्याने पेटंटची संख्याही वाढत आहे. विद्यापीठाच्या अधिविभागातील संशोधक प्राध्यापकांना भारत सरकारबरोबरच इतर देशांतील पेटंट कार्यालयाकडून दाखल संशोधनास १५६ स्वामित्व हक्क (पेटंट) देण्यात आले आहेत.

हे स्वामित्व हक्क दिल्यानंतर संबंधित संशोधनावर पूर्णपणे हक्क संशोधकाचा राहिला आहे. विद्यापीठातील संशोधकांनी केलेल्या संशोधनाचा उपयोग समाज व उत्पादनाच्या निर्मितीसाठी होत असून, या माध्यमातून शेकडो स्टार्टअप सुरू करण्यात आले आहेत. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, तंत्रज्ञान, वनस्पतिशास्त्र, बायोकेमिस्ट्री, संगणकशास्त्र या विषयांमध्ये हे पेटंट मिळाले आहेत.

### संशोधन प्रोत्साहन योजनेचेही बळ


देशात वैज्ञानिक वातावरण निर्माण व्हावे व विविध स्तरांवर संशोधन करून अधिकाधिक स्वामित्व हक्क (पेटंट) विद्यार्थ्यांच्या नावावर यावेत, या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे गेल्या दशकापासून विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती आणि संशोधन प्रोत्साहन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. याचाही सकारात्मक परिणाम पेटंट मिळवण्यात झाला आहे.




### दृष्टिक्षेपात अधिविभाग मिळालेले पेटंट

| | | | |
|---|---|---|---|
| भौतिकशास्त्र | ३९ | इतर | ०५ |
| रसायनशास्त्र | ३८ | संगणकशास्त्र | ०५ |
| तंत्रज्ञान | २१-०९ | इलेक्ट्रॉनिक्स | ०४ |
| वनस्पतिशास्त्र | ०७ | बायोकेमिस्ट्री | ०२ |

### आयपीआर मिळालेले पेटंट




> शिवाजी विद्यापीठातील शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी सातत्याने उच्च दर्जाचे व नावीन्यपूर्ण उपयोजित संशोधन करत आहेत. विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा धोरणामुळे संशोधकांना पेटंट अर्जासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य उपलब्ध होते. यामुळेच विद्यापीठातील पेटंट्सची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.
>
> **डॉ. गजानन राशीनकर**
> **संचालक, बौद्धिक संपदा कक्ष, शिवाजी विद्यापीठ.**

**दै. पुण्यनगरी**



Smart कोल्हापूर

पुण्य नगरी

- कोल्हापूरला बनावट दारूचा धोका!
- इचलकरंजी मनपा निवडणुकीत १२ जागांवर फेरबदल
- केडीसीसी बँकेत शेतकऱ्यांना कृषी ड्रोनचे वितरण

▸▸ आतील पानात

कोल्हापूर । मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५

**उजळले ज्ञानपीठ...**

६३ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळलेली शिवाजी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत.

तरुण भारत संवाद
मंगळवार १८ नोव्हेंबर २०२५ कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक क्रांतीत सोनेरी पाऊल

## छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श व प्रेरणेने वाटचाल : ज्ञान मंदिराने केला तळागाळापासून जागतिक लौकिकापर्यंतचा यशस्वी प्रवास

प्रतिनिधी
कोल्हापूर

दक्षिण महाराष्ट्राच्या शैक्षणिक हृदयस्थलीत वसलेल्या शिवाजी विद्यापीठाने आज आपल्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त एका यशस्वी अध्यायाची साक्ष दिली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील क्रांतीचा हा सोनेरी दिवस असून विविध सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात जागतिक स्तरावर विद्येच्या या मंदिराने तळागाळापासून जागतिक लौकिकापर्यंतचा अमूल्य असा यशस्वी प्रवास केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श व प्रेरणा घेऊन या विद्यापीठाचे नाव शिवाजी विद्यापीठ ठेवण्यात आले. १९६२ साली स्थापन झालेल्या या विद्यापीठाने त्याकाळी महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील शैक्षणिक वाळवंटात एक क्रांतीचे सोनेरी पाऊल टाकले

- **तीन जिल्ह्यात २९७ महाविद्यालयासह १६ संशोधन संस्था संलग्नित**
- **सहा दशकात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विस्तार**

होते. ते आज उंचावतच गेले आहे. गेल्या ६३ वर्षांत या विद्यापीठाने केवळ कोल्हापूरचे नावच जागतिक पातळीवर उंचावले नाही, तर लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानगंगेच्या माध्यमातून सक्षम बनवून समाजाला नवे दिशादर्शक विद्यार्थी घडवले. 'ज्ञानमेवामृतम्' हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू झालेला विद्यापीठाचा अतुलनीय योगदानाचा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

१८ नोव्हेंबर १९६२ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

राधाकृष्णन यांच्या हस्ते औपचारिक स्थापना झाली. पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी 'उजाड माळावर विद्यानगरी उभी करणे' हे ध्येय साकार केले. सुरुवातीला ३४ संलग्न महाविद्यालये आणि १४ हजार विद्यार्थी असलेल्या या विद्यापीठाने केवळ पाच पदव्युत्तर विभागांपासून सुरू केला होता. आज शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूरसह सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये असून एकूण २९७ महाविद्यालये व १६ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्न आहेत. तीन लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून दूरशिक्षणाच्या माध्यमातूनही सुमारे २५ हजार विद्यार्थी ज्ञानाचे धडे गिरवत आहेत. गेल्या सहा दशकांत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची विस्ताराने वाढ झाली आहे.

**संशोधनात जागतिक पातळीवर झेप**

संशोधन क्षेत्रात विद्यापीठाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. सामग्री विज्ञान (मटेरियल सायन्स) संशोधनात भारतातील १० व्या स्थानावर असून, नेचर ई–जर्नलचा वापर करणाऱ्या दुसऱ्या विद्यापीठांपैकी एक आहे. राष्ट्रीय मूल्यमापन व मान्यता परिषदेने (NAAC) 'A++' मानांकन दिले असून, NIRF रँकिंगमध्येही ते आघाडीवर आहे.

**दुरशिक्षण केंद्रांद्वारे शिक्षणाची संधी**

दूरशिक्षण केंद्राद्वारे एम.ए. इतिहासासारखे अभ्यासक्रम चालवून तळागाळातील विद्यार्थी, गृहिणी, शेतकरी आणि कामगारांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. ८१ अभ्यास केंद्रांद्वारे ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू असून समाजातील विविध घटकांना शिक्षणाची जोड मिळत आहे.

**आव्हाने आणि भविष्याची दृष्टी**

६३ वर्षांच्या या प्रवासात महामारी, आर्थिक अडचणी व संसाधन अभावासारख्या आव्हानांना तोंड देत विद्यापीठाने प्रगती केली. डॉ. अप्पासाहेब पवारांपासून आजच्या प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावींपर्यंत प्रत्येकाने तळागाळातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची गंगा वाहिली. भविष्यात डिजिटल शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि हरित ऊर्जेवर भर देण्याच्या योजना आहेत. शिवाजी विद्यापीठाचा हा प्रवास केवळ शैक्षणिक नाही, तर सामाजिक परिवर्तनाला दिशा देणारा मैलाचा दगड आहे.

### शिवाजी विद्यापीठाचा गौरवशाली वारसा वृद्धींगत करण्यासाठी प्रयत्न

शिवाजी विद्यापीठाने ६३ वर्षात शैक्षणिक क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे. विद्यापीठाने देशासह जागतिक स्तरावर नाव उंचावले आहे. शिवाजी विद्यापीठाची गौरवशाली परंपरेचा वारसा जपत तो अधिक वृद्धिंगत व सक्षमीकरणासाठी सर्वांचे योगदान महत्वाचे आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय विकासावर भर देण्यासाठी विद्यापीठाने शैक्षणिक क्रांती घडवली आहे.

– **डॉ. सुरेश गोसावी**, प्रभारी कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**दै. तरूण भारत**



## ज्ञान मंदिर उजळले...!

कोल्हापूर : जागतिक स्तरावर नावलौकीक मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठाचा आज ६३ वा वर्धापन दिन सोहळा दिमाखात साजरा होत आहे. ६८ वर्षाच्या कार्यकाळात विद्येच्या या ज्ञान मंदिराने सर्वच क्षेत्रात अनेक विद्यार्थी घडवले. वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला येथील प्रशासकीय इमारतीला केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासह विद्यापीठाचा परिसर उजळून निघाला होता. (छाया : रियाज ट्रेनर).

दै. तरूण भारत

## विविध उपक्रमाने होणार सोहळा साजरा

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६३ वा वर्धापनदिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा आज ६३ वा वर्धापन दिन सोहळा साजरा होत आहे. वर्धापन दिनानिमित्त सकाळी ८.३० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. यानंतर दिवसभर विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्य प्रशासकीय इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाईने सजवले होते. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासह विद्यापीठाचा परिसर उजळून निघाला होता.

आज होणाऱ्या वर्धापन दिन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कवियीत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय माहेश्वरी उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी व प्रभारी प्र–कुलगुरू प्रा. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. वर्धापनदिन सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम



विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक आणि प्रशासकीय सेवक विद्यापीठाशी संलग्नि गुणवंत प्राचार्य, शिक्षक आणि प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील गुणवंत शिक्षक आणि प्रशासकीय सेवकांची पाल्ये, बॅ. पी. जी पाटील आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशसासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, संचालक समन्वयक, शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांनी वर्धापन दिन समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**दै. जनप्रवास**

शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत. पिकाच शेतामध्ये वापरले जात आहे.



## विद्युत रोषणाईने उजळली इमारत

शिवाजी विद्यापीठाच्या ६३व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळलेली शिवाजी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत. (छाया: डॉ. अलोक जत्राटकर)

दै. तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कारांचे आज वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीपीठाच्या प्रशासकीय गुणवत्ता अभियान आणि प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीनुसार जाहीर केलेल्या पुरस्कारांचे आज वितरण होणार आहे. याची अंमलबजावणी ३१ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत

## ▪ मान्यवरांच्या हस्ते गौरव

करण्यात आली होती. योजनेअंतर्गत विविध समित्यांमार्फत सर्व अध्यासने, अधिविधाभ, प्रशासकीय विभाग आणि सहाय्यभूत सेवा विभाग यांना भेटी देऊन, समित्यांनी विद्यापीठ प्रशासनाला अहवाल सादर केला होता. त्यानुसार हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

### पुरस्कारप्राप्त प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय विभागांची नावे

प्र–कुलगुरू, संलग्नता टी–१ विभाग प्रथम क्रमांक, प्र–कुलगुरू, तक्रार निवारण कक्ष, द्वितीय क्रमांक, कुलसचिव, कॉमन फॅसिलीटी सेंटर–प्रथम क्रमांक,कुलसचिव, संगणक केंद्र, – द्वितीय क्रमांक, परीक्षा आणि मूल्यमापन केंद्र, आयटी सेल विभाग– प्रथम क्रमांक, परीक्षा आणि मूल्यमापन केंद्र, परीक्षा प्रमाद विभाग– द्वितीय क्रमांक, वित्त व लेखाधिकारी, भांडार विभाग– प्रथम क्रमांक, वित्त व लेखाधिकारी, कॅशबुक विभाग –द्वितीय क्रमांक, सहाय्यभूत सेवा विभाग, मुलींचे वसतीगृह – प्रथम क्रमांक, सहाय्यभूत सेवा विभाग, आरोग्य केंद्र– द्वितीय क्रमांक, सहाय्यभूत सेवा विभाग, बॅ. खडेकर ज्ञानस्त्रोत केंद्र – तृतीय क्रमांक, सहाय्यभूत सेवा विभाग, इंटरनेट युनिट –उत्तेजनार्थ.

### पदव्युत्तर अधिविभाग :

स्कूल ऑफ नॅनो सायन्स (प्रथम), अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रशाला (द्वितीय),

समाजशास्त्र अधिविभाग (तृतीय), दूरशिक्षण व ऑनलॉन शिक्षण केंद्र (उत्तेजणार्थ)

स्त्री अभ्यास केंद्र (प्रथम), श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन (द्वितीय)

# प्रशासकीय सेवेत विद्यापीठ दुसऱ्या स्थानी



- उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे मूल्यांकन जाहीर
- सेवा पुस्तक अद्ययावत, अनुकंपा भरती, पदोन्नतीने नियुक्तीसाठी पैकीच्या पैकी गुण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने राज्यात प्रशासकीय सेवा देण्यात दुसरे स्थान पटकावले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने केलेल्या प्रशासकीय मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठाने १०० पैकी ६६ गुण मिळवत दुसरे स्थान मिळवले आहे. राज्यातील तेरा अकृषी विद्यापीठांचे प्रशासकीय मूल्यांकन केले. यातून विद्यापीठाने हे स्थान पटकावले आहे. विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक आधुनिक आणि डिजिटल करण्यात विद्यापीठाने सर्वाधिक मिळवले आहेत.

या मूल्यांकनामध्ये गोंडवाना विद्यापीठाने ६८ गुणांसह पहिला क्रमांक मिळवला आहे. उच्च शिक्षण विभागाने सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत विविध नऊ निकषांवर राज्यातील विद्यापीठांचे प्रशासकीय मूल्यांकन केले. शिवाजी विद्यापीठाने सेवापुस्तक अद्ययावतीकरणामध्ये २० पैकी २०, तर सर्व संवर्गाची अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करणे, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती आणि अनुकंपा नियुक्तीची १० पैकी १० गुणांची कमाई केली आहे. बिंदुनामावली प्रमाणीकरणामध्ये १० पैकी ८ गुण मिळाले आहेत. मात्र, सेवा नियम, सरळसेवा नियुक्ती रिक्त परिस्थिती या निकषामध्ये अवघे चार गुण मिळाले. आकृतीबंध व आयजीटीओ पोर्टलवर नोंदणीमध्ये विद्यापीठाला गुणांचे खाते उघडता आले नाही. आयजीटीओ पोर्टलमध्ये चांगली कामगिरी असूनदेखील काय कमी पडले, याचे विश्लेषण केले जाणार आहे.

## विद्यापीठाकडून दर्जेदार सुविधा देण्यावर भर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामाकाजाचमध्ये सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी योगदान देत विशेष शैलीने सेवा दिली आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या विचारांचा वारसा जपत प्रशासनाला लावलेली शिस्त व परंपरा अबाधित ठेवली आहे. त्यामुळेच हे यश मिळाले आहे. यापुढेही यापेक्षा चांगल्या सुविधा देण्यावर विद्यापीठ प्रशासनाचा भर असेल.

– डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

**दै. तरूण भारत**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' या कार्यशाळेस उपस्थित महिलांसमवेत प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, प्रशिक्षक व इतर मान्यवर.

# ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन

- **विद्यापीठात स्वयंरोजगारातून सक्षमीकरण कार्यशाळा**

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रामीण भागातील महिलांमध्ये कष्ट आणि कौशल्याची कामे करण्याची क्षमता असते. त्यांना सक्षमीकरणाच्या योग्य संधी प्रदान करण्याची आवश्यकता असते. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाची यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशाळा, बेटी बचाओ अभियान आणि कोल्हापूर जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' या दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

ग्रामीण भागातील महिलांना स्वरोज़गाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. रोटरी क्लब ऑफ एक्झिक्युटिव्ह, इचलकरंजी यांच्या सहयोगाने विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेत जिल्हा परिषदेचे जिल्हा अभियान व्यवस्थापक दयानंद पाटील, इचलकरंजी रोटरीचे सहाय्यक गव्हर्नर गिरीश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रशाळेचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

डॉ. उर्मिला दशवंत यांनी आभार मानले. यावेळी डॉ. तानाजी चौगुले, बेटी बचाओ अभियान समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, रोटरीचे अध्यक्ष संतोष साधळे, सचिव मयूर पाटील आणि प्रोजेक्ट चेअरमन शीतल उपाध्ये उपस्थित होते.

दै. पुण्यनगरी

# विद्यापीठात एनर्जी स्वराज यात्रेचे स्वागत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'सोलर मॅन ऑफ इंडिया' नावाने ओळखले जाणारे आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. चेतन सिंग सोळंकी यांच्या 'एनर्जी स्वराज' यात्रेचे स्वागत करण्यात आले.

डॉ. सोळंकी यांनी आयआयटी, मुंबई येथील प्राध्यापकपदाचा राजीनामा देऊन आपले जीवन पूर्णपणे एनर्जी स्वराज यात्रेला समर्पित केले आहे. त्यांनी खास सौरऊर्जा बस तयार केली असून, सौरचलित विविध उपकरणे वापरून, तसेच याच बसमध्ये राहून पर्यावरण आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेचे महत्त्व पूर्ण भारत देशामध्ये प्रसार करत आहेत. सोळंकी यांनी या यात्रेची सुरुवात २०२० मध्ये केली असून, २०३० पर्यंत या यात्रेमध्ये सहभागी होऊन घरी न परतण्याचा निर्धार त्यांनी केलेला आहे. त्यांनी ५ वर्षांत आतापर्यंत ६५ हजार किलोमीटर एवढे अंतर पूर्ण केले आहे. या यात्रेचे भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रा. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. सी. बा. दास, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. एस. जे. शिंदे आदींनी स्वागत केले. संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी 'एनर्जी स्वराज' या संकल्पनेमागील भूमिका स्पष्ट केली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये एनर्जी स्वराज यात्रेचे स्वागत करण्यात आले.**

दै. पुढारी

# 'एनर्जी स्वराज' यात्रेचे स्वागत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथे 'सोलर मॅन ऑफ इंडिया' या नावाने ओळखले जाणारे आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. चेतनसिंग सोळंकी यांच्या 'एनर्जी स्वराज' यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

डॉ. सोळंकी यांनी आयआयटी, मुंबई येथील प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन जीवन पूर्णपणे एनर्जी स्वराज यात्रेला समर्पित केले आहे. त्यांनी खास सौर ऊर्जा बस तयार केली असून सौरचलित विविध उपकरणे वापरून तसेच याच बसमध्ये राहून पर्यावरण व शाश्वत विकासाच्या दृष्टीने ऊर्जेचे महत्त्व सांगत आहेत. यात्रेची सुरुवात २०२० मध्ये केली असून ते २०३० पर्यंत यात्रेमध्ये सहभागी होऊन घरी न परतण्याचा निर्धार केला आहे. त्यांनी पाच वर्षांत आतापर्यंत ६५ हजार किलोमीटर अंतर पूर्ण केले आहे.

भौतिकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रा. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. सी. बा. दास, डॉ. एस. एस. पाटील यांनी एनर्जी स्वराज यात्रेचे स्वागत केले. संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी 'एनर्जी स्वराज' या संकल्पनेमागील भूमिका स्पष्ट केली.

**दै. सकाळ**




कोल्हापूर : डॉ. चेतन सिंग सोळंकी यांच्या एनर्जी स्वराज यात्रेचे शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातील प्राध्यापकांनी स्वागत केले.

# विद्यापीठात आली 'एनर्जी स्वराज यात्रा'

## भौतिकशास्त्र विभागाकडून स्वागत

कोल्हापूर, ता. १७ : 'सोलर मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले डॉ. चेतन सिंग सोळंकी यांची 'एनर्जी स्वराज' यात्रा आज शिवाजी विद्यापीठात आली. यात्रेचे स्वागत विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी केले.

संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी 'एनर्जी स्वराज' या संकल्पनेमागील भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. यावेळी भौतिकशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, ए. व्ही. मोहोळकर, आर. एस. व्हटकर, व्ही. एस. कुंभार, सी. बी. दास, एस. एस. पाटील, ए. आर. पाटील, एम. आर. वायकर, एस. जे. शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. सोळंकी यांनी आयआयटी मुंबई येथील प्राध्यापकपदाचा राजीनामा देऊन आपले जीवन पूर्णपणे एनर्जी स्वराज यात्रेला समर्पित केले आहे. त्यांनी खास सौरऊर्जा बस तयार केली आहे. सौरचलित विविध उपकरणे वापरुन तसेच या बसमध्ये राहून ते पर्यावरण आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्वच्छ आणि नविकरणीय ऊर्जेचे महत्त्व पूर्ण देशामध्ये प्रसार करीत आहेत. त्यांनी या यात्रेची सुरुवात २०२० मध्ये केली असून; २०३० पर्यंत या यात्रेमध्ये सहभागी होऊन घरी न परतण्याचा निर्धार केला आहे. त्यांनी पाच वर्षात आतापर्यंत ६५ हजार किलोमीटर अंतर पूर्ण केले आहे.

त

ाधव
ाकार

ातिश
ार्शल
ाहेत.
, पंच
ाहेत.
साठी
ा २५
आले

ाजिक
ा हा
ाला.
एबीपी
िनाश
ाहादेव
यांचे

# भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे एनर्जी स्वराज यात्रेचे स्वागत

## विद्यार्थ्यांनी घेतला सौर चलित बसचा अनुभव

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे 'सोलर मॅन ऑफ इंडिया' या नावाने ओळखले जाणारे आयआयटी मुंबईचे प्राध्यापक डॉ. चेतनसिंग सोळंकी यांच्या 'एनर्जी स्वराज' यात्रेचे स्वागत करण्यात आले. या यात्रेमधील सौर चलित बसचा अनुभव घेण्यासाठी शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन, पदवी, पदव्युत्तर, तसेच संशोधक विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

डॉ. सोळंकी यांनी आपल्या मुंबईतील आयआयटीमधील प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन आपले जीवन पूर्णपणे एनर्जी स्वराज यात्रेला समर्पित केले आहे. डॉ.




शिवाजी विद्यापीठात एनर्जी स्वराज यात्रेचे स्वागत करताना भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे व प्राध्यापक.

सोळंकी यांनी खास सौर ऊर्जा बस तयार केली असून, सौरचलित विविध उपकरणे वापरुन तसेच ह्याच बसमध्ये राहून पर्यावरण आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्वच्छ आणि नविकरणीय ऊर्जेचे महत्त्व पूर्ण भारत देशामध्ये प्रसार करीत आहेत. त्यांनी या यात्रेची सुरुवात २०२० मध्ये केली असून ते २०३० पर्यंत या यात्रेमध्ये सहभागी होऊन घरी न परतण्याचा निर्धार केलेला आहे. त्यांनी ५ वर्षात आतापर्यंत ६५,००० किलोमीटर एवढे अंतर पूर्ण केले आहे. या उपक्रमात भौतिकशास्त्र अधिविभागासह इतर अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या एनर्जी स्वराज यात्रेचे भौतिकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रा. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. सी. बा. दास, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. एस. जे. शिंदे आणि संशोधक विद्यार्थी यांनी स्वागत केले. संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी 'एनर्जी स्वराज' या संकल्पनेमागील भूमिका स्पष्ट केली. सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी सर्वांना आवाहन केले. विद्यापीठ प्रशासनानेही या यात्रेच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.

# शिवाजी विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपकुलसचिव गजानन पळसे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा व शारिरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या सहाय्यक संचालक डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास अधिविभागाचे डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

**दै. पुण्यनगरी**

# शिवाजी युनिव्हर्सिटी झोनल फुटबॉल स्पर्धेत 'शिवराज' तृतीय

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालयाच्या फुटबॉल संघाने शिवाजी युनिव्हर्सिटी झोनल फुटबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून कराड येथे होणाऱ्या इंटरझोनल फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र झाला. या स्पर्धा क्रीडा संकुल कोल्हापूर येथे पार पडल्या. या स्पर्धेचे आयोजन डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कोल्हापूर यांनी केले.

शिवराज महाविद्यालयाने झोनल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत फुटबॉल प्रेक्षकांचे मन जिंकले. शिवराज व गडहिंग्लजचे नाव जिल्ह्यात गाजवले. सेमी फायनलच्या सामना शिवराज व स. ब. खाडे कोपर्डे यांच्यात चुरशीने पार पडला. सामना पूर्णवेळ गोलशून्य सुटला. ट्रायबेकरवर ४-५ असा स. ब. खाडे संघाने विजय मिळवला. तृतीय क्रमांकाचा सामना शिवराज व शिवाजी विद्यापीठ या संघांत झाला. शिवराज महाविद्यालयाने ४-१ अशा गोलफरकाने विजय मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. विजयी खेळाडूंना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष अॅड. दिग्विजय कुराडे, संचालिका प्रा. बीनादेवी कुराडे, संचालक प्रा. विश्वजित कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर क्रीडाशिक्षक डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, किरण कावणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.



**गडहिंग्लज : झोनल फुटबॉल स्पर्धेतील विजयी 'शिवराज'चा फुटबॉल संघ. सोबत मार्गदर्शक शिक्षक.**

महाविद्यालयाच्या फुटबॉल संघातील खेळाडू असे- कुपिंदर पोवार, सूरज कोंडुस्कर, श्रावण जाधव, सौरभ हुलसार, सौरभ मोहिते, अमर गवळी, मारुती कोळी, ओमकार बेळगुंदकर, आर्यन दळवी, सागर पोवार, राहुल पोवार, यश खोत, प्रसाद पोवार, ओमकार पाटील, प्रवीण पोवार, तेजस शेंडे. तुषार कांबळे, प्रशांत सलवादे, आकाश देसाई, संदीप हिरेकुडी आदी.

**दै. पुढारी**

# विद्यापीठाच्या बीए ड्रेस मेकींग अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर : २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू झाल्या असून यातील बीए ड्रेस मेकींग ५ व बीए ड्रेस मेकींग ६ या दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

सोमवारी विविध १२६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध १८७ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी विद्यापीठाने गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून साताऱ्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

दै. पुढारी

# कर्मवीर हिरे महाविद्यालयात आजपासून आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा

**गारगोटी : पुढारी वृत्तसेवा**


येथील श्री मौनी विद्यापीठच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केली जाणारी शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय हॉलीबॉल स्पर्धा १८ व १९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. स्पर्धेत सातारा, कोल्हापूर, सांगली या ३ जिल्ह्यातील नामांकित महाविद्यालयांचे संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कार, संघ भावना आणि आरोग्यदायी स्पर्धात्मकता वाढविण्यास निश्चितच मदत करेल, असा विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. उदयकुमार शिंदे व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सचिन चौगले यांनी व्यक्त केला आहे.

**सातारा जिल्ह्यातील संघ :** दहिवडी कॉलेज, मुधोजी कॉलेज फलटण, आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज नागठाणे, दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कराड. **कोल्हापूर जिल्ह्यातील संघ :** अण्णासाहेब डांगे कॉलेज हातकणंगले, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, देवचंद कॉलेज अर्जुननगर. **सांगली जिल्ह्यातील संघ :** विलिंग्डन महाविद्यालय सांगली, के. बी. पी. कॉलेज ईश्वरपूर, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आष्टा, सी. आय. एम. डी. आर. कॉलेज सांगली.

**दै. पुण्यनगरी**

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६३ वा वर्धापन दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन मंगळवार, दि. १८ रोजी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त सकाळी ८.३० वाजता ध्वजवंदन, सकाळी ८.४५ वाजता प्रमुख पाहुणे जळगाव येथील कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी भूषविणार आहेत. विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशाकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव करण्यात येणार आहे, तसेच प्रशासकीय अभियान गुणवत्ता अभियान पुरस्कार वितरण केले जाणार आहे. या कार्यक्रमाला प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.



**दै. पुढारी**

संक्षिप्त

## विद्यापीठ सत्र परीक्षा; ४४,३७३ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला ४४ हजार ३७३ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. दि. १७ रोजी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीसीए, बीबीए, एमएस्सी, एमसीए, एमबीए, एमए, एमकॉम, बीएड अशा १२६ अभ्यासक्रमांच्या १८७ केंद्रावर सुरळीतपणे झाल्या. सोमवारी बीए (ड्रेसमेकिंग) विविध सत्रांचे निकाल जाहीर झाले. भरारी पथकाकडून साताऱ्यामधून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे.

दै. पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षेस ४४ हजार विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी १२६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १८७ परीक्षा केंद्रांवर पार पडल्या. या परीक्षांसाठी ४४,३७३ विद्यार्थी उपस्थित होते.

दिवसभरात दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सोमवारी या पथकाकडून साताऱ्यामधून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली असून, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमधून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली नाही.

**दै. पुण्यनगरी**

# मोडी लिपी अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मान्यताप्राप्त मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्स नाईट कॉलेज कोल्हापूरच्या मराठी विभागाच्या वतीने सुरू करण्यात आला असून, प्रवेशासाठी दि. २० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नाईट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार असून, प्रवेशासाठी किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी दि. २० पर्यंत संपर्क साधून प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील यांनी केले आहे.

**दै. पुढारी**

## मोडी लिपी अभ्यासक्रम प्रवेशासाठी २० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मान्यताप्रात मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्स मराठी विभागाच्या वतीने सुरू करण्यात आला असून प्रवेशासाठी २० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. कोर्समध्ये मोडी लिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण दिले जाणार आहे. नाईट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स चालणार आहे. प्रवेशासाठी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधून प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. उत्तम पाटील यांनी केले आहे.

दै. पुण्यनगरी

# शिवमची बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**नवे पारगाव :** कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद अंतर्गत झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत ४७ ते ५० कि. वजनी गटात शिवम हवालदार याने द्वितीय क्रमांक पटकवला. या यशामुळे आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. शिवम हवालदार हा तळसंदे, ता. हातकणंगले येथील डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पसमध्ये सिव्हिल विभागात द्वितीय वर्षामध्ये शिक्षण घेत आहे. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ क्रीडा संकुल येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत त्याने हे यश मिळवले. आंतरविभागीय स्पर्धा दि. १९ व २० रोजी होणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त माजी आ. ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. सतीश पावसकर यांनी शिवम आणि जिमखानाप्रमुख व्ही. बी. उतळे यांचे अभिनंदन केले.



**दै. लोकसत्ता**

# डॉ. मेघा पानसरे यांना भीमाबाई आंबेडकर पुरस्कार

**कोल्हापूर :** येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, शिवाजी विद्यापीठांच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांची सातारा येथील संबोधी प्रतिष्ठानने घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भीमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या २७ व्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



या संस्थेच्या वतीने साहित्य,कला, संस्कृती व परिवर्तन चळवळ आदी क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्याच्या हेतूने सुरू करण्यातआलेल्या पुरस्काराचे स्वरुप दहा हजार रुपये, स्मृतीचिन्ह, शाल असे आहे, असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश इंजे, निमंत्रक दिनकर झिंब्रे यांनी जाहीर केले आहे. हा पुरस्कार श्रमिक मुक्ती दलाचे नेते डॉ. भारत पाटणकर यांच्या हस्ते ७ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता सातारा नगरवाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. पानसरे या कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी स्थापन केलेल्या श्रमिक प्रतिष्ठानच्या विश्‍वस्त असून स्त्रीयांच्या चळवळीत त्या सक्रिय आहेत त्यांनी अनुवादित व संपादित केलेली २० पुस्तके प्रकाशित झाली असून ४० रशियन कथा, कवितांचा मराठीत अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. राजर्षी शाहू महाराजांचे डॉ. जयसिंगराव पवार लिखित चरित्र त्यांनी रशियन भाषेत अनुवादित केले आहे.